स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/२०२३/ 5227 दिनांक- 7 NOV 2023

**परिपत्रक –**

**विषय- ओळखपत्राबाबत..**

संदर्भ – सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं.संकीर्ण-२०१४/प्र.क्र१६/१८(र.व.का) दिनांक १० ऑक्टोंबर २०२३.

सर्व संस्था प्रमुख/कार्यालयाप्रमुख यांना वरील परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, संदर्भिय परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम माहीती होण्यासाठी दर्शनी भागावर ओळखपत्र लावण्यात यावे. जे कर्मचारी दर्शनी भागावर ओळखपत्र लावणार नाही अशा कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली जाईल, याची आवश्यक ती खबरदारी घेण्यात यावी.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

राज्य शासनातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी ओळखपत्र दर्शनी भागावर लावण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - २०१४/प्र.क्र.१६/१८ (र. व का.)**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२३.

<u>वाचा :-</u>

शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०७ मे, २०१४ चे परिपत्रक.

<u>शासन परिपत्रक-</u>

राज्यातील नागरिक त्यांच्या कामाच्या निमित्ताने निरनिराळ्या शासकीय कार्यालयांत येत असतात. त्यांच्या कामाशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पदनाम माहीत होण्यासाठी किंवा त्यांची भेट घेण्यासाठी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची ओळख पटणे आवश्यक आहे. परंतु शासकीय कार्यालयांत हजर असलेले संबंधित अधिकारी/कर्मचारी हे दर्शनी भागावर ओळखपत्र लावत नाहीत. ओळखपत्राबात एखाद्या नागरिकाने विचारणा केली असता शासकीय अधिकारी / कर्मचारी ओळखपत्र दाखवीत नाहीत.

२. या सर्व बाबी विचारात घेता सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात असताना त्यांचे ओळखपत्र दर्शनी भागावर लावावे, जेणेकरून याबाबत नागरिकांची तक्रार प्राप्त होणार नाही असे उपरोक्त दिनांक ०७ मे, २०१४ च्या शासन परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे. तसेच सदर सूचनांची अमंलबजावणी करण्यात कुचराई करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुद्ध वरिष्ठ अधिका-यांनी योग्य ती कारवाई करावी अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

उपरोक्त बाबी विचारात घेता या परिपत्रकान्वये दिनांक ०७ मे, २०१४ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचा पुनरुच्चार करण्यात येत आहे. शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रवेशाच्या वेळी पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या ओळखपत्राची काटेकोरपणे तपासणी करून ओळखपत्र दर्शनी भागावर न लावणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावे संबधित प्रशासकीय विभागांना पाठवावीत. संबंधित प्रशासकीय विभागांनी ओळखपत्र दर्शनी भागावर न लावणाऱ्या कर्मचाऱ्यांबाबत कारवाई करून त्याचा मासिक अहवाल विहित विवरणपत्रात (परिशिष्ट "अ") सामान्य प्रशासन विभाग (प्र.सु., र. व का.) यांच्याकडे सादर करावा.

३. सदर शासन परिपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२३१०१०१६४०१४३५०७ असा आहे.

हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ROSHANI DINESH KADAM PATIL

Digitally signed by ROSHANI DINESH KADAM PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT,
2.5.4.20=685cbbb5899027ea29d44ae02d12f2c1313143ad8376755d0e815a1eb20fd0ce, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=16D26A3CE7C86CC341C246E6B8468A80B20659CCB13144AF609F03226E90BA0C, cn=ROSHANI DINESH KADAM PATIL
Date: 2023.10.10 16:43:33 +05'30'

(रो.दि.कदम - पाटील)
उपसचिव

विभागीय कार्यालय पुणे. 11 OCT 2023

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

## परिशिष्ट "अ"

विभागाचे नाव :-

| अ.क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्याचे नाव | ओळखपत्र क्रमांक | केलेली कारवाई |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| | | | |